महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ९९ वा | दिनांक : १३/०१/२०२५ | वार : सोमवार

## नियमात बसत नाहीत अशा लाडक्या बहीणींनी अर्ज काढून घ्यावेत



**नाशिक** : नियमात बसत नाहीत अशा लाडक्या बहीणींनी अर्ज काढून घ्यावेत, अन्यथा सरकारने दंडासह वसूली करावी, असे आवाहन छगन भुजबळ यांनी केले आहे. नाशिकमध्ये बोलत असताना छगन भुजबळ यांनी लाडकी बहीण योजनेचा गैरवापर केला गेल्याचे म्हंटले आहे. लाडकी बहीण योजनेचा फायदा काही प्रमाणात नको त्यांना झाला आहे. काही प्रमाणात हे खरे असल्याचे भुजबळ यांनी म्हंटले आहे.

छगन भुजबळ म्हणाले, लाडकी बहीण योजनेसाठी आता वेगळे नियम केले आहेत. त्यात एका घरात दोन महिलांना देता येत नाही, मोटार गाडी असेल तर त्यांना देता येणार नाही. गरीबांना त्याचा लाभ झाला पाहिजे हा या योजनेचा उद्देश आहे. जे नियमात बसत नाही त्यांनी स्वतःहून आपले नावे काढले पाहिजे. जे पैसे दिले गेले आता ते परत मागण्यात काही अर्थ नाही, ते आता मागण्यात येवू नये. मागे जे झाले ते लाडक्या बहिणींना अर्पण, मात्र याच्यापुढे लोकांना सांगावे, जे नियमित नाही त्यांनी स्वतःहून नावे काढून घ्यावे. अन्यथा सरकारने दंडासह वसुली करावी, असे आवाहन छगन भुजबळ यांनी केले आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी भुजबळांचा सल्ला घ्यावा असे मला वाटत नसल्याचे म्हणत टोला लगावला होता. यावर प्रतिक्रिया देताना छगन भुजबळ म्हणाले, पक्षाने मला आदेश दिला आहे, वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे. खाली आपण कोणतेही भाषी करू नये. त्यामुळे मी त्या संदर्भात काही स्टेटमेंट करू इच्छित नाही. हा विषय संपला आहे. माझे विरुद्ध कोणी काही बोलले नाही तर मीही कोणाविषयी बोलणार नाही, असेही छगन भुजबळ म्हणाले आहेत.

दरम्यान, शेगाव येथे माली समाजाच्या मेळाव्यात देखील छगन भुजबळ यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी बोलताना छगन भुजबळ म्हणाले, जातिनिहाय जनगणनेची मागणी आम्ही अनेक वर्षांपासून करत आहोत. मात्र आमची वेळोवेळी फसवणूक झालेली आहे. मराठा आरक्षणाला माझा विरोध नाही. मात्र ते आमच्यात आले तर आम्हालाही काही मिळणार नाही आणि त्यांनाही काही मिळणार नाही. त्यामुळे जातीनिहाय जनगणना करा नाहीतर आम्हाला ५१ टक्के घोषित करा, अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली आहे.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, अशा कार्यक्रमाला जाणे मी टाळतो. कारण समाज एक असला तरी पक्ष वेगळे असतात, विचारसरणी वेगळी असते. मी ओबीसींच्या प्रश्नावर शिवसेना सोडली. मी नरसिंह राव यांच्याकडे गेलो. त्यावेळी नरसिंह राव यांनी ओबीसी समाजाची सेवा करण्याचा सल्ला दिला होता. त्यातूनच समता परिषद स्थापन झाली. आदिवासी, दलित, ओपन आणि ओबीसी या चार वर्गात बाबासाहेबांनी समाजाला बांधले व्ही पी सिंहानी नंतर मंडळ आयोगासाठी काम केले. त्यानंतर आपल्याला ३० टक्के आरक्षण मिळाले.

## तामिळनाडूचे राज्यपाल मुख्यमंत्र्यांना म्हणाले - अहंकार चांगला नाही



**तामिळनाडू** : तामिळनाडू विधानसभेच्या अधिवेशनात राष्ट्रगीत गाण्यावरून राज्यपाल आरएन रवी आणि मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांच्यात शब्दिक चकमक सुरू आहे. ६ डिसेंबरला सीएम स्टॅलिन यांनी राज्यपालांनी भाषण न देता विधानसभा सोडणे बालिशपणाचे लक्षण असल्याचे म्हटले होते. यावर राज्यपाल रविवारी म्हणाले- सीएम स्टॅलिन यांचा अहंकार चांगला नाही.

राज्यपाल आरएन रवी यांनी सोमवारी सोशल मीडियावर लिहिले की, 'राष्ट्रगीताचा योग्य आदर राखण्याचा आणि संविधानात अंतर्भूत मूलभूत कर्तव्ये पार पाडण्याचा स्टॅलिन यांचा दावा मूर्खपणाचा आणि बालिश आहे. ते भारताला राष्ट्र मानत नाहीत आणि राज्यघटनेचा आदर करत नाहीत. असा अहंकार चांगला नाही. देश आणि संविधानाचा अपमान जनता सहन करणार नाही.

याआधी डीएमके प्रमुख आणि सीएम स्टॅलिन यांनी १० जानेवारीला त्यांच्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले होते. ते म्हणाले होते, 'राज्यपाल विधानसभेत येतात, पण सभागृहाला संबोधित न करता परत जातात. यासाठी त्यांनी राज्यपालांच्या कृतीला बालिश म्हटले.

ते म्हणाले- मला वाटते राज्यपाल तामिळनाडूचा विकास पचवू शकत नाहीत. मी एक सामान्य माणूस असू शकतो, पण तामिळनाडू विधानसभा करोडो लोकांच्या भावनांचे केंद्र आहे. अशा गोष्टी पुन्हा दिसणार नाहीत.

६ जानेवारीपासून सुरू झालेल्या तामिळनाडू विधानसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यपालांनी भाषण न करता सभात्याग केला. ज्याला राज्याच्या मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांनी विरोध केला होता. हे बालिश आणि लोकशाही परंपरांचे उल्लंघन असल्याचेही स्टॅलिन म्हणाले होते.

तमिळ थाई वाल्थू हे राज्यगीत सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीला गायले जाते आणि शेवटी राष्ट्रगीत गायले जाते. मात्र राज्यपाल रवी यांनी या नियमावर आक्षेप घेत राष्ट्रगीत दोन्ही वेळी गायले पाहिजे, असे सांगितले. राजभवन म्हणाले- राज्यपालांनी सभागृहात राष्ट्रगीत गाण्याचे आवाहन केले. पण नकार दिला गेला. तो चिंतेचा विषय आहे संविधान आणि राष्ट्रगीताचा अवमान झाल्याने संतप्त झालेल्या राज्यपालांनी सभागृह सोडले.

सत्ता हाती घेतल्यापासून राज्यपाल आणि स्टॅलिन सरकारमधील संबंध कडवट झाले आहेत. द्रमुक सरकारने त्यांच्यावर भाजपच्या प्रवक्त्याप्रमाणे वागण्याचा आणि बिले आणि नियुक्त्या रोखल्याचा आरोप केला आहे. राज्यपालांनी म्हटले आहे की, संविधानाने त्यांना कोणत्याही कायद्याला मान्यता रोखण्याचा अधिकार दिला आहे. राजभवन आणि राज्य सरकारमधील वाद सर्वोच्च न्यायालय आणि राष्ट्रपती भवनापर्यंत पोहोचला आहे.फेब्रुवारी २०२४ मध्ये, राज्यपालांनी विधानसभेत पारंपारिक भाषण देण्यास नकार दिला होता आणि म्हटले होते की मसुद्यात दिशाभूल करणारे दावे असलेले अनेक परिच्छेद आहेत जे सत्यापासून दूर आहेत. राज्यपालांच्या अभिभाषणाच्या सुरूवातीस आणि शेवटी राष्ट्रगीत वाजले पाहिजे, असे राजभवनाने म्हटले होते, राज्यपालांनी भाषण वाचून दाखविले.

## अमरावतीत १०० हून अधिक महिलांना विषबाधा

**अमरावती** : अमरावतीमध्ये १०० हून अधिक महिलांना विषबाधा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. नांदगाव पेठ एमआयडीसीतील एका कंपनीत ही धक्कादायक घटना घडली. गोल्डन फायबर एलएलपी कंपनीत काम करणाऱ्या महिलांना विषबाधा झालेली आहे. या महिलांना उपचारासाठी अमरावतीच्या जिल्हा सामन्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

संबंधित घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीतील पाण्यामुळे किंवा नाश्त्यामुळे विषबाधा झाल्याचा संशय काही महिलांनी व्यक्त केला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या काही महिलांची गंभीर असल्याची प्राथमिक माहिती आहे. एका महिलेने सांगितल्यानुसार, ७०० महिलांना मळमळ, उलटी आणि पोटदुखीचा त्रास होत आहे.

नांदगाव एमआडीसीतील कापड उद्योगाची गोल्डन फायबर एलएलपी कंपनीत आल्यानंतर सकाळी नऊ वाजेपासून महिलांना त्रास सुरू झाला. परंतु, त्यावेळी कंपनीने कोणालाही बाहेर येऊ दिले नाही. उलट डॉक्टरांना कंपनीत बोलावले. काही लोकांना सुटी दिली. कंपनीने या घटनेत बेजाजबदपणे काम केले. महिलांना त्रास सुरू झाल्यानंतर थेट घरी जाण्यास सांगितले. कुणालाही आतमध्ये येऊ देत नव्हते. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर पोलिस घटनास्थळी आले. पोलिसांनी सर्वांशी बोलल्यानंतर या महिलांना उपचारासाठी रुग्णालयात आणल्याचे मनसेच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले.

पाणी पिल्यानंतर मळमळीचा त्रास सुरू झाला. त्यानंतर उलटी झाली असून पोटदुखीचा त्रास होत असल्याचे एका महिलेने माध्यमांशी बोलताना सांगितले. जवळपास ७०० महिलांना त्रास होत असल्याचे या महिलेने सांगितले. कंपनीत आल्यानंतर पाणी पिल्यापासून हा त्रास होत असल्याचेही त्यांनी म्हटले.

विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी अमरावतीच्या अडगावमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा झाली होती. त्यानंतर आज एमआडीसीतील कंपनीत काम करणाऱ्या महिलांना विषबाधा झाली आहे. यामुळे आता कंपनीत काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ जानेवारी २०२५

# दुय्यम निबंधक कार्यालयातून कुणबी नोंदी देण्यास होतेय टाळाटाळ



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड येथील दुय्यम निबंधक कार्यालयातून कुणबी नोंद असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती देण्यास टाळाटाळ होत असल्याने गरजूंना चकरा माराव्या लागत आहेत.कुणबी नोंद शोध मोहिमेत कन्नड तालुका जिल्ह्यात पहिल्या स्थानी राहिला. महसूल प्रशासनाने युध्दपातळीवर शोध मोहीम राबवून नोंदी शोधविण्यात यश मिळविले.

न्या.शिंदे समीतीने यातील बहुतांश नोंदी शासनाच्या पोर्टल वरती टाकून लाभार्थ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळविण्याचा मार्ग सुकर केला. अलीकडच्या काळात शोध मोहिम व नोंदी पोर्टल वरती अपलोड करण्याचे काम थांबले आहे. त्यामुळे अद्याप काही नोंदी सार्वजनिक केल्या गेल्या नाहीत.

कुणबी प्रमाणपत्र काढण्यासाठी पोर्टल वरील प्रती अपलोड करुण फाईल सोबत जोडणे पुरेसे असले तरी, जातपडताळणी प्रमाणपत्र व इतर शासकीय कामांसाठी सदरील मोडी, उर्दू, फारसी कागदपत्रे लिप्यांतर, भाषांतरित करुण पुरावा सादर करावा लागत असल्याने, सबंधित नोदींची मुळ प्रत काढण्यासाठी कन्नड येथील दुय्यम निबंधक कार्यालयात चकरा माराव्या लागत आहे. मात्र ही कागदपत्रे देण्याची कर्मचाऱ्यांची मानसिकता नसल्याने, संबंधित कार्यालयातील कर्मचाऱ्यां कडून नोंद प्रत देण्यास टाळाटाळ होत आहे.

विविध कारणे सांगून अर्जदारांना पंधरा पंधरा दिवस चकरा मारुन ही खाली हाताने परतावे लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.याकडे संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकार्यांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांना कडून होत आहे.

# राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये समृद्धी शिंदे हिला सुवर्णपदक



**कन्नड (अरुण थोरात):** जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र सॉफ्टबॉल संघटना यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील संघांनी सुवर्णपदक पटकावले. या संघात हस्ता ता. कन्नड येथील राधाबाई माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाची खेळाडू समृद्धी प्रवीण शिंदे हिने सहभाग घेतला.

या संघाने दिल्ली संघाला मात करून ही स्पर्धा जिंकली आहे. या संघाने सुवर्णपदक पटकाविले. त्याबद्दल समृद्धी प्रविण शिंदे हीचा तालुक्यातील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका क्रीडा संकुल समिती अध्यक्ष व आमदार संजना ताई जाधव यांच्या हस्ते समृद्धीचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी संजनाताई बोलताना म्हटल्या की कन्नड तालुक्यातील खेळाडूंसाठी मी कधी पण काहीही असलं तरी खेळाडूंसाठी तत्परतेने मदत करण्याचं काम मी करणार आहे. मला अभिमान आहे पहिली महिला खेळाडू म्हणून समृद्धी शिंदे राष्ट्रीय पदक विजेत्या झाल्या त्याबद्दल मला मनस्वी आनंद होत आहे.

पंचायत समिती सदस्य किशोर पवार, माजी सरपंच वासडी राहुल पाटणी, राम काका पवार, तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य प्रवीण शिंदे, खो-खो चे जिल्हा पंच रविकुमार सोनकांबळे आदि उपस्थित होते. तसेच जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष डॉ दत्ताभाऊ पात्रीकर, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, डॉ फुलचंद सलामपुरे, महाराष्ट्र सॉफ्टबॉल संघटनेचे सहसचिव गोकुळ तांदळे, डॉ उदय डोंगरे, तालुका क्रीडा अधिकारी सचिन पुरी, प्रा राकेश खैरनार, गणेश भटूदे, संतोष अवचार, भीमा मोरे, सचिन बोर्डे, राधाबाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आबासाहेब शिंदे, मुख्याध्यापक किशोर चोंदे, कृष्णा घुगे, विजय सिंग बारवाल, मुक्तानंद गोस्वामी, श्याम खोसरे, राकेश निकम, वसीम शेख, करण राठोड, सचिन शेळके आदींनी अभिनंदन केले आहे

# वाल्मीक कराडच्या कृतीमुळे बीड बदनाम

**बुलढाणा :** संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून राजकारण केले जात असून बीडची बदनामी केली जात असल्याचा आरोप पंकजा मुंडे यांनी भाजप आमदार सुरेश धस यांच्यावर केला होता. यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पलटवार केला आहे. वाल्मिक कराडच्या कृती आणि कामाच्या पद्धतीमुळे जिल्हा बदनाम होत असल्याची टीका सुप्रिया सुळे यांनी केली. त्या आज सिंदखेड राजा येथे माध्यमांशी बोलत होत्या.

राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त सुप्रिया सुळे यांनी सिंदखेड राजा येथे जिजाऊ माता यांच्या समाधीस्थळी अभिवादन केले. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत विविध विषयांवर भाष्य केले. यावेळी त्यांना पंकजा मुंडेंच्या वक्तव्याबाबत विचारले असता त्यांनी उपरोक्त टीका केली. तसेच बीड येथील हत्याकांडातील आरोपींना फाशी देण्याची मागणी केली.

**काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?** परभणी आणि बीड या दोन्ही घटना माणुसकीला काळिमा फासणाऱ्या आहेत. राष्ट्रवादीचे खासदार बजरंग सोनावणे यांनी संसदेत पहिल्यांदा महाराष्ट्राच्या वतीने परभणी आणि बीडप्रकरणी आवाज उठवला. संदीप क्षीरसागर, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, मुंदडा, अजित पवारांचे आमदार सोळंके यांनी विधानभवनात हा मुद्दा मांडला, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

**कृती आणि कामाच्या पद्धतीमुळे जिल्हा बदनाम** पत्रकारांनी पंकजा मुंडे यांच्या विधानाविषयी विचारल्यानंतर कोणताही जिल्हा व्यक्तीमुळे नाही, तर कृतीमुळे बदनाम होतो. वाल्मिक कराडच्या कृती आणि कामाच्या पद्धतीमुळे जिल्हा बदनाम होत असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले. तसेच वाल्मिक कराड आणि त्यांच्यासोबत जी कोणी दोषी असतील, त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. ज्यांनी ज्यांनी ही हत्या केली असेल त्यांना भर चौकात फाशी दिली पाहिजे, अशी मागणीही सुप्रिया सुळे यांनी केली.

**बीड प्रकरणी चेष्टा लावली आहे का?** बीड येथील घटना अत्यंत क्रूर आणि गलिच्छ आहे. यात राजकारण आणू नये, असे आवाहन करत माणुसकीच्या नात्याने परभणी आणि बीड येथील घटनेत न्याय देण्याची मागणी करत असल्याचे त्यांनी म्हटले. या संघर्षाच्या आणि अडचणीच्या काळात ३३ दिवसांनंतरही अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. सातत्याने प्रश्न मांडले जात आहेत, त्याचे उत्तर येत नाही. अजूनही एक खुनी फरार आहे. वाल्मिक कराडला ईडीची नोटीस आली तरीही कारवाई झाली नाही. त्याच्यावर मकोकाही लावला नाही. तो अटकेत आहे, पण त्याची अटक कशी झाली? तो शरण आला. ही चेष्टा लावली आहे का? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.

**काय म्हणाल्या होत्या पंकजा मुंडे?** सुरेश धस यांच्यामुळेच बीड बदनाम होत आहे. त्यांनी राजकीय भूमिका न घेता हा विषय संवेदनशीलपणे समजून घेतला असता तर बीडची अशी बदनामी झाली नसती. आमच्या जिल्ह्यात स्वाभिमानी लोक आहेत. मी महिला राजकारणी म्हणून तिथे काम करते. सर्वात कष्टाचे जीवन असणारे लोक आमच्या जिल्ह्यात आहेत. आम्ही काम करतो. आता सांगितली जात आहे तशी स्थिती असती तर आम्ही दरोडे टाकायला गेलो असतो ना? अशा घटनेने जिल्हा बदनाम होत असेल तर आरटीआयमधून माझ्याकडे सर्व जिल्ह्यांची माहिती आहे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

**अंजली दमानिया यांनीही घेतला समाचार** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही पंकजा मुंडे यांचा समाचार घेतला. बीड बदनाम आपोआप नाही होत, तुम्ही भावा-बहिणीने तुमच्या दहशतीने बदनाम केले आहे, अशी टीका त्यांनी केली. तुम्ही म्हणता तुम्ही बीड मध्येच राहता आणि तुम्ही एक महिला देखील आहात, पण तुम्ही हे विसरता की, हे गुंड तुमचेच आहेत आणि तुम्हाला सुरक्षा आहे, सामान्य जनतेला नाही. तुमच्या गुंडांची दहशत त्या सामान्य जनतेला भोगावी लागते, असा टोला अंजली दमानिया यांनी पंकजा मुंडे यांना लगावला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ जानेवारी २०२५


## “भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजशास्त्रीय विचारांचे मूलाधार”

## समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त व संदर्भयुक्त ग्रंथ

**लेखक :- डॉ. हेमंत सोनकांबळे**
प्रकाशक :- कैलास पब्लिकेशन, छत्रपती संभाजीनगर
प्रकाशन तारीख :- १२ ऑक्टोबर, २०२४
पृष्ठ संख्या :- २९०
किमत :- ₹ ३५०

समाजशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे प्राध्यापक डॉ. हेमंत सोनकांबळे यांचे “भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजशास्त्रीय विचारांचे मूलाधार” हे पुस्तक विशेषत : एन.ई.पी. 2020, सी.बी.सी.एस./यु.जी.सी. अभ्यासक्रमावर आधारित आहे. हे पुस्तक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि महाराष्ट्रातील इतर सर्व विद्यापीठांच्या बी.ए. आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. याशिवाय, SET/NET आणि इतर स्पर्धा परीक्षांच्या संदर्भातही हे पुस्तक अभ्यासाच्या दृष्टीने खूप महत्त्वपूर्ण आहे. या पुस्तकात समाजशास्त्राचे विविध दृष्टिकोन, भारतीय सामाजिक विचारवंतांची भूमिका आणि आधुनिक समाजशास्त्राचे परिप्रेक्ष्य मांडले गेले आहेत.

महात्मा जोतीराव फुले कला व विज्ञान महाविद्यालय, गोकुंदा (किनवट) येथे समाजशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेले लेखक, आमचे मित्र, डॉ. हेमंत लक्ष्मणराव सोनकांबळे हे समाजशास्त्र विषयाचे अभ्यासक असून शिक्षण, संशोधन आणि सामाजिक परिवर्तन या क्षेत्रांत त्यांचे अनमोल योगदान आहे. ते कनिष्ठ महाविद्यालयीन समाजशास्त्र परिषदेचे राज्य सचिव आहेत, त्यांनी राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर समाजशास्त्र विषयक २९ शोधनिबंध सादर केले आहेत. फुले-शाहू-आंबेडकर चळवळींचे तसेच आदिवासी प्रश्नांचे ते अभ्यासक आहेत. आदिवासी गोंड जमतीवर त्यांनी संशोधन केले आहे. याशिवाय 'समाजशास्त्र परिचय आणि सामाजिक संस्था' (२०१४), 'पाचात्य समाजशास्त्रीय विचारवंत' (२०१८) हे समाजशास्त्राचे तर 'जाती अंताची लढाई' (२०२१) कविता संग्रहाचे लेखन त्यांच्या नावे आहे.

समाजशास्त्र हे मानवजातीच्या उत्क्रांतीपासूनच आपल्या सभोवतालच्या समाज व जगाला जाणून घेण्यासाठी महत्त्वाचे शास्त्र आहे. याच अनुषंगाने “भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजशास्त्रीय विचारांचे मूलाधार” हे पुस्तक भारतीय समाजशास्त्रीय विचारांना एक सुस्पष्ट चौकट प्रदान करते. या पुस्तकात भारतीय समाजशास्त्रातील सामाजिक विचारवंतांच्या विचारांची सखोल मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक प्रकरणात महत्त्वपूर्ण सामाजिक विचारवंतांचे जीवनचरित्र, कार्य, विचार आणि योगदान यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. प्रमुख प्रकरणांमध्ये महात्मा जोतीराव फुले यांचे शेतकरी, शिक्षण व धर्मसुधारणांसाठीचे योगदान, अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेले प्रयत्न याची मांडणी केली आहे, राजर्षी शाहू महाराज यांचे आरक्षण विषक धोरण, सामाजिक समता, शैक्षणिक धोरण व महिलांसाठी केलेले महत्त्वाचे कार्य याची माहिती दिली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्यायाची वैचारिक भूमिका, जाती व्यवस्थेवर सखोल अभ्यास, कामगार कल्याण आणि संविधान निर्मितीतील योगदानाचा आढावा घेतला आहे. या शिवाय महाराजा सयाजीराव गायकवाड, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये, डॉ. एम.एन. श्रीनिवास, डॉ. इरावती दिनकर कर्वे, डॉ.ए.सी.दुबे आदींचे जीवनचरित्र,कार्य आणि योगदान यांची विस्तृतपणे मांडणी केली आहे. पुस्तकातील दुसरे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे समाजशास्त्रज्ञांचा सिद्धान्ताचे विश्लेषणही अत्यंत तपशीलवार आहे. हे पुस्तक समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी केवळ एक शैक्षणिक साधन नाही, तर सामाजिक परिवर्तनाच्या व बदलांच्या गतीला समजून घेण्यासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. या पुस्तकाची भाषा सोपी, प्रवाही व अभ्यासकांना आकलन होईल अशी आहे. प्रकरणांची सुलभ आणि स्पष्ट भाषेत मांडणी, गुंतागुंतीच्या संकल्पनांना सोप्या शब्दांत समजावून देण्याचा कौशल्यपूर्ण प्रयत्न केला आहे. लेखकाने विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून लेखन केले आहे. विचारवंतांचे जीवनचरित्र, विचार, तत्त्वज्ञान, सिद्धांत व संकल्पना सहज समजावून देण्यात लेखक यशस्वी ठरले आहेत.

डॉ. हेमंत सोनकांबळे यांचे “भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजशास्त्रीय विचारांचे मूलाधार” हे पुस्तक समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक असून आजच्या समाजात सामाजिक विषमता, धर्म, भाषा व जातीवाद आणि भेदभावावर आधारित समाजात अनेक सामाजिक समस्या दिसून येतात,या समस्यांवर वैचारिक आणि सैद्धांतिक दृष्टिकोनातून उपाय सुचवण्यासाठी या पुस्तकातील विचारवंतांचे विचार आणि भूमिका महत्त्वाच्या ठरतील असा विश्वास वाटतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामाजिक चळवळी क्षीण झाल्या आहेत, त्या गतिमान करण्यास या विचारवंतांचे विचार मदत करतील असी आशा वाटते. NEP २०२० च्या अनुषंगाने भारतीय समाजशास्त्राचे मूलभूत विचार, संकल्पना आणि तत्त्वज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य हे पुस्तक यशस्वीरीत्या करेल, या बाबत माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. हे पुस्तक समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी, अभ्यासकांसाठी आणि प्राध्यापिकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. ते प्रत्येकाने खरेदी करून आपल्या संग्रही ठेवावे असे आहे.




**पुस्तक परीक्षण**
**डॉ. प्रकाश खेत्री,**
7843092244
अध्यक्ष
कनिष्ठ महाविद्यालयीन
समाजशास्त्र परिषद, महाराष्ट्र


## जीवनात किती ही केले तरी सुख भगवंताच्या चरणी : ह.भ.प. युवराज देशमुख



**कन्नड (अरुण थोरात):** जैतखेडा ता.कन्नड येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता "भाविक गोंधळ अंगी विश्वासाचे बळ" या संत निळोबाराय महाराजांच्या गौळणपर अभंगातून ह.भ.प युवराज महाराज देशमुख यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली.पुढे आपल्या उपदेशात महाराज म्हणाले की, संसार हा असार असून येथे फक्त एक भगवंतच एकमेव सार आहे.

त्यामुळे जीवनात कितीही केले कमविले तरी माणसाला या ऐहिक जगात शाश्वत सुख नाही, या भव माये मुळे माणसाचे पोटच भरत नाही. म्हणून भगवान श्रीकृष्णाने आपल्या गोपाळ सवंगड्यांना सांगितले की तुम्हाला जर पोट भरायचे आहे, सुख प्राप्त करायचे असेल तर माझ्या मागे या आणी तुम्ही पुरे म्हणणार नाही तोपर्यंत मी तुम्हाला देत राहील. हरिनाम सप्ताह सांगते निमित्त सकाळी संपुर्ण गावातुन टाळमृदूंगा च्या गजरात ग्रंथदिंडी काढण्यात आली.

गावात ठिकठिकाणी आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. प्रत्येक दारासमोर गुढी उभारण्यात आली. टाळ मृदंग हरिनामा च्या तालावर अबाल-वृध्दांसह तरुणाईने ठेका धरला होता. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त, महाराज मंडळी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. सप्ताह यशस्वीतेसाठी परिश्रम घेणाऱ्या वारकरी मंडळींचा सप्ताह समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. काल्याच्या किर्तना नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांचा कालावधी वाढवा



**कन्नड (अरुण थोरात):** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थींचा कालावधी वाढवून उर्वरित मानधन देण्याची मागणी युवा कौशल्य विकास संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दि. ९ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत राज्यातील एक लाख दहा हजार बेरोजगार युवक - युवतींना राज्यातील विविध आस्थापनांमध्ये सहा महिने मुदतीसाठी प्रशिक्षणार्थी म्हणुन रुजु करून घेण्यात आलेले होते.

या प्रशिक्षणार्थींचा सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण होत आहे. तो कालावधी संपत येत असल्याने तसेच तीन ते चार महिन्याचे मानधन अजूनही मिळाले नसल्याने राज्यातील लाखो युवक युवतींवर उपासमारीची वेळ आलेली आहे. तरी तो कालावधी वाढविण्यात यावा व मानधन दरमहा नियमितपणे दिल्या जावे. यासाठी युवा कौशल्य विकास संघटनेतर्फे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रशांत पाटील शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ व विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी सचिन खरे, जयदीप मगर, सोमीनाथ मखरे, जाबेर पठाण, प्रकाश पल्हाळ, खलिक शेख, अक्रम पटेल, सचिन राजपूत, अमोल गायकवाड आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ जानेवारी २०२५

## महापुरुषांचे विचार आत्मसात करून त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे तेवत ठेवावा - प्रा. डॉ. महेश मोटे





**मुरूम, ता. उमरगा, (सुधीर पंचगल्ले)** : माझ्या राज्यात माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे, यासाठी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराजांना पराक्रमी राजा बनविण्यासाठीचे बाळकडू राजमाता जिजाऊ यांनी दिले. कर्तव्य, निष्ठा आणि शौर्य यांच्या जोरावरच समाजाला नवीन दिशा देता येते यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. तरुणांना जीवनाचे उद्दिष्ट कसे असावे याची शिकवण खऱ्या अर्थाने स्वामी विवेकानंदांनी दिली म्हणूनच त्यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. या दोन्हीही महापुरुषांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांचे विचार सर्वांनी आत्मसात करून त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे तेवत ठेवावा असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चौकात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने रविवारी (ता. १२) रोजी आयोजित कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. महेश मोटे बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी विठ्ठल पाटील होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डी. डी. गव्हाणे म्हणाले की, मराठा सेवा संघाच्या वतीने शहरात सर्वच महापुरुषांच्या जयंत्या व स्मृतिदिन सामाजिक सलोख्याच्या अनुषंगाने सर्व जाती-धर्माच्या नागरिकांना सोबत घेऊन राबवली जातात, हे कौतुकास्पद आहे. यामुळे सामाजिक बांधिलकी जोपासण्यास मदत होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक डी. डी. गव्हाणे, माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे, बाजार समितीचे संचालक सुरेश मंगरूळे, माजी नगरसेवक अजित चौधरी, शिवसेना जिल्हा उपप्रमुख भगत माळी, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. डॉ. रवींद्र गायकवाड, भाजप नेते अरविंद फुगटे, सुधीर चव्हाण, काँग्रेस कमिटीचे राहुल वाघ, धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब भालकाटे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. दत्तात्रय इंगळे, भगत माळी, अजित चौधरी आदींनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी रवींद्र जाधव, संदीप जाधव, संदीप बाबळसुरे, गोपाळ इंगोले, भरत होनाळे, अंकुश शिंदे, किशोर शिंदे, आकाश धर्माधिकारी, प्रतीक राठोड, महेश शिंदे, सुनील निलवडे, आकाश क्षीरसागर, श्रावण इंगळे, पिंटू बेंडकाळे, लखन भोसले, मराठा सेवा संघाचे तालुका उपाध्यक्ष संजय सावंत, शहराध्यक्ष श्रीधर इंगळे आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार मोहन जाधव यांनी केले. सूत्रसंचालन अंकुश शिंदे तर आभार सिद्धलिंग हिरेमठ यांनी मानले. यावेळी शहरातील बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.

फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील शिवाजी चौकात महापुरुषांच्या जयंती प्रसंगी अभिवादन करताना सर्व मान्यवर, पदाधिकारी व अन्य.

## आरोग्य विज्ञान विद्यापीठात जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी




**नाशिक:** - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी श्री. नितीन काळे, श्री. विनायक ढोले, श्री. दिलीप राजपूत, श्री. निलेश उबाळे, श्री. सुमित काकड, श्री. एस.एन. भामरे, श्री. बी.एस. बच्छाव, श्री. एस.पी.वाघ, श्री. जयवंत पाटील अधिकारी व कर्मचारी मोठया उपस्थित होते.

## प्रयत्न आणि सरावाने यशाचा मार्ग सुकर होतो - दिग्ददर्शक मृणाल गायकवाड




**धुळे** : प्रयत्न, सरावामुळे यश संपादन करणे सुलभ होते, असे मत मराठी चित्रपट दिग्दर्शक मृणाल गायकवाड यांनी व्यक्त केले.

शहरातील झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालयात स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कार्यक्रम झाला. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जयहिंद संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील होते. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रशेखर पाटील, शरद बच्छाव, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष विजय बोरसे, प्राचार्य डॉ. पी. एच. पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मृणाल गायकवाड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी यश संपादन करण्यासाठी प्रयत्नशील असावे. क्षेत्र कोणतेही असो त्या क्षेत्रात मेहनत घेण्याची तयारी ठेवावी. तसेच संस्कृती व परंपरा विसरू नये, असेही ते म्हणाले. या वेळी त्यांनी मराठी सिनेसृष्टीतील फिल्म मेकिंगपासून ते प्रोडक्शन मॅनेजमेंट, नाट्यशास्त्राची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर दिली. विजय पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. प्रियंका निकुंभ, प्रा. स्वाती देसले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. योगिता पाटील यांनी आभार मानले.

शेलापागोटेमुळे कार्यक्रमात रंगत रंगचैतन्य स्नेहसंमेलनात झालेल्या निबंध, वक्तृत्व, चित्रकला, पाककला, रांगोळी, मेंदी, विविध गुणदर्शन स्पर्धा, गीत गायन, वाद्य वादन, फॅन्सी ड्रेस, एकपात्री नाट्यछटा, नृत्य स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देण्यात आली. त्यापूर्वी सकाळच्या सत्रात शेलापागोटे कार्यक्रम सादर करण्यात आला.

## ३-४ महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका



**शिर्डी** : विधानसभा निवडणुकीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. या निवडणुका कधी होणार, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली. शिर्डी येथे भाजपचा राज्यस्तरीय मेळावा आज पार पडला. यावेळी बोलताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन-चार महिन्यात येतील, असे सूतोवाच देवेंद्र फडणवीस यांनी केले.

विधानसभा निवडणुकीत भरघोस यश मिळवल्यानंतर भाजपकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. या अनुषंगानेच आज शिर्डी येथे राज्यस्तरीय अधिवेशन बोलावल्याचे म्हटले जात आहे. या अधिवेशनात मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील यांनी विरोधकांवार जोरदार हल्ला चढवला. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विधानसभेपेक्षाही मोठा विजय प्राप्त करायचा, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले.

स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका तीन-चार महिन्यात येतील, असे सूतोवाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सुप्रीम कोर्टाचा निकाल येणे बाकी आहे. तो निर्णय आल्यानंतर या निवडणुका होतील. विधानसभेत विजय मिळवला तर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सुद्धा विजय मिळवायचा आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र भाजपसाठी महत्वाचा आहे. ज्यांना श्रद्धा आणि सबुरीचा अर्थ समजला नाही त्यांची हालत बुरी झाली, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी नाव न घेता विरोधकांना टोला लगावला. कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे भाजपला विजय मिळाला असल्याचे म्हणत यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांचे आभार मानले. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी महाभारतातील गोष्ट सांगत नरेंद्र मोदी यांना माधव आणि मतदारांना केशव अशी उपमा दिली. या केशव आणि माधव यांच्यामुळे आपल्याला निवडणुकीच्या युद्धात विजय मिळाला, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मला कुठल्याही धार्मिक ग्रंथापेक्षा भारताचे संविधान महत्वाचे आहे. कारण हेच संविधान सामान्यांची सेवा करण्यासाठी मला शक्ती देते, असे नरेंद्र मोदी म्हणतात. संविधानाचे यंदाचे अमृतमहोत्सवी वर्ष भारताची लोकशाही मजबूत करण्यासाठी, संविधान रुजवण्यासाठी वापरायचे आहे, असे फडणवीस म्हणाले.